भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र.६१९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०३/०९/२०१७

१) बारमधुन विदेशी दारु व नगदी पैश्याची चोरी . :—

दिनांक १+२/०९/२०१७ चे रात्र. दर. यातील किरण बार चिचाळ येथील बारचा समोरील शटरचा कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन कोंडा तोडुन आत प्रवेश करुन बार मध्ये ठेवलेले आयबी ७५० एमएल नी भरलेली, ०१ नग, आय बी १८० एमएल ने भरलेले ५७६ नग, आयबी १९० एमएल ने भरलेले १२० नग, एमबी ७५० एमएल ने भरलेले १० नग, ओसी ब्लु १८० एमएल ने भरलेले ४८ नग, ओसी ब्लु ९० एमएल ने भरलेले १०० नग, नंबर ०१ चे ९० एमएल नी भरलेले ९६नग हायवर्ड बिअर ६५० एमएल नी भरलेले ४८ नग अशी एक लाख सव्वीस हजार दोनशे /—रु. ची विदेशी दारु व गल्यातील नगदी ५,०००/—रु. असा एकुण १ लाख ३१ हजार २०० /—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी किरण बालकिशन सुरगोणेवार वय २७ वर्ष, रा. चिचळ यांचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. दिघोरी येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. यादव पो.स्टे दिघोरी हे करीत आहेत.

२) कृषी केन्द्र दुकानातील काऊटंर ड्रावरमधील नगदी पैश्याची व बॅकेचे चेक बुक, आधार कार्ड, पासबुक चोरुन नेल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक ०१/०९/२०१७ चे ०८.५० ते ०२/०९/२०१७ चे ०९.०० वा. दर. पर्यंत यातील फिर्यादी नितीन केशव वनवे वय ३२ वर्ष, व. रा. रेंगोळा ह. मु. मानेगाव सडक ओम गणेश कृषी केन्द्र मानेगाव सडक येथील कृषी केंन्द्र दुकानाचे समोरील लोखंडी शटर वाकवुन आत प्रवेश करुन काऊटंर चे ड्रावर मध्ये ठेवलेले नगदी ६०,०००/—रु. व फिर्यादीचे एसबीआय बॅक व बॅक ऑफ इंडीया चे चेक बुक व फिर्यादीचे नावाचे चेक बुक व आधार कार्ड, पास बुक कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने तसेच ग्राम पंचायत मानेगावचे समोरील दाराचा कोंडा तोडल्याने फिर्यादी नितीन केशव वनवे वय ३२ वर्ष, रा. रेंगोळा ह. मु. मानेगाव सडक यांचे लेखी रिपोर्ट वरुन पो.स्टे. लाखनी येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोसरे पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

३) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन बासाच्या दांडयाने डोक्यावर मारुन जखमी करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक ०१/०९/२०१७ चे १९.३० ते २३.४३ वा. पर्यत. यातील फिर्यादी शामलाल यादव कोल्हे वय ४५ रा. सोमेवाडा हा आपले बकऱ्या बांधीत असता आपल्या सासुला तुम्ही जेवन करुन घ्या म्हणाला तेव्हा आरोपीने फिर्यादीला तीचा जेवन माझ्या कडे सांगीतला आहे तु कशाला तीला जेवायला सांगतो असे म्हणुन भांडण करुन आपल्या हातातील बासाच्या दांडयाने फिर्यादीचे डोक्यावर मारुन जखमी करुन जिवाने मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. फुलबांधे पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

४) स्थागुशा भंडारा याची कारवाई . :—

दिनांक ०२/०९/२०१७ चे १७.०० ते १८.०० वा. दर. यातील आरोपी हा त्याचे चारचाकी हातठेल्यावर समोसे, वडे, भजे तयार करण्याच्या व्यवसाय कामी घरघुती वापराचे एचपी गॅस सिलेंडर वापर करतांनी मिळुन आल्याने त्याचे पासुन २ नग एचपी गॅस सिलेडर, १ रेगुलेटर, लोखंडी शेगळी, असा एकुण ५,७५०/—रु. चा माल मिळुन आल्याने सपोनी. सोनटक्के स्थागुशा भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३,७ जिवानावश्यक वस्तु अधीनीयम भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**५) वाहन सार्वजनीक ठिकाणी थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस अडथडा निर्माण केल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक ०१/०९/२०१७ चे १०.३०वा. दर. यातील आरोपी आपल्या ताब्यातील वाहण टाटा एस गाडी सार्वजनीक ठिकाणी आमरोडवर बसस्थानक समोर ऊभे करुन येणाऱ्या जाणाऱ्या रहदारीस अडथळा निर्माण केल्याने पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बोरगाव पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**६) तलावाचे पाण्यात मुलाचे प्रेत मिळुन आले :-**

दिनांक ०२/०९/२०१७ चे १५.०० वा. दर यातील यातील मृतक श्रीनथ जयपाल मस्के वय १३ वर्ष, रा. खुर्शीपार हा घरच्या बकऱ्या चारायला गेला असता त्याचे कपडे खुर्शीपार तलावाचे काठावर लहान भावाला दिसले त्याने मृतक चा शोध घेतला व तो न मिळाल्याने गावकऱ्यांना सांगीतले गावकऱ्यांनी शोध घेतला असता तलावाचे पाण्यात मृतकचे प्रेत मृत अवस्थेत मिळाल्याने फिर्यादी प्रशांत भाऊराव लांजेवार वय २४ वर्ष, रा. शुक्रवारी वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंगाडे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**७) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :-**

दिनांक १७/०८/२०१७ चे १८.३० वा. दर यातील यातील मृतक पतीराम श्रावण बांते वय ६० वर्ष, रा. धोप याची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यास स्वगावा वरुन डॉ. मेघरे भंडारा यांचे दवाखाण्यात औषधोपचारा करीता भरती केले असता हॅड्रसिलचा ऑपरेशन करीत असता मरण पावल्याने मर्ग दाखल करुन पुढील तपास कामी पो. स्टे. आंधळगाव येथे पाठविण्यात आले होते. परंतु त्याचे तपासामध्ये सदर घटणा ही पो. स्टे. भंडारा येथील असल्याने पो. स्टे. भंडारा येथे कागदपत्र पाठविण्यात आले त्यांचे कागदपत्रावरुन सरतर्फे फिर्यादी सपोनि. ऊईके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. खाडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**८) अवैध दारु/ जुगार अडयावर धाडी . :-**

दिनांक ०२/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. कारधा, तुमसर, गोबरवाही, पवनी व लाखांदुर येथे दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३५ लिटर हातभटटी दारु + ५० किलो सडवा+ साहीत्य किंमती ६७५०/-रु. व २ लिटर ३४० मिली लिटर देशी दारु किंमती ६७६ /-रु. तसेच जुगारातुन किंमती २६००/-रु. चा माल असा एकुण १०,०२६/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :-**

दिनांक ०२/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली आहे त्यापैकी अवैध प्रवासी ०३ तीन सिटर वाहनांवरती १० केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७१ केसेस करण्यात आलेल्या आहे.


जी. एन. खंडाते<br>
पोलीस वाचक शाखा<br>
भंडारा<br>
दुरध्वनी.क्र. ९८२३३२२९५४


प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.